# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

## दिनांकः17.07.2024 वारःबुधवार

---

1. मेक इन इंडिया उत्पादने आंतरराष्ट्रीय मागणीत वरचढ, पंतप्रधानांनी प्रसारित केली झलक,
2. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून सुधारीत जीडीपी अंदाज, भारत वेगवान अर्थव्यवस्था असल्याचा निर्वाळा,
3. गुजरातमध्ये 13 सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांच्या शैक्षणिक शुल्कात मोठी कपात,
4. केरळला मुसळधार पावसानं झोडपल्यानं मोठं नुकसान, अतिदक्षतेचा इशारा अद्यापही कायम आणि
5. आशिया चषक टी 20 क्रिकेट स्पर्धेसाठी भारतीय महिला संघ कोलंबोत दाखल.

**<u>पीएम मेक इन इंडिया</u>**

भारतीय अर्थव्यवस्था, मेक इन इंडिया योजनेमुळे जागतिक स्तरावर कशी उंचावत आहे याची एक झलक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या समाजमाध्यमांवर प्रसारित केली आहे. यामध्ये, भारतीय बनावटीच्या विविध उत्पादनांच्या निर्यातीच्या माध्यमातून जागतिक बाजारपेठेत भारताच्या वाढता प्रभाव, सहभाग, उपस्थितीविषयी त्यांनी भाष्य केलं आहे.

भारतीय बनावटीच्या सायकलची निर्यात इंग्लंड, जर्मनी आणि नेदरलँड्स या देशांमध्ये वाढल्यानं जागतिक स्तरावर तिचा बोलबाला झाला आहे. बिहारमध्ये तयार होणारे बूट रशियन सैन्याद्वारे वापरले जातात. हा टप्पा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारताच्या उच्च उत्पादन क्षमता, गुणवत्ता यावर शिक्कामोर्तब करणारा आहे. तर आगामी विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेसाठी, जागतिक पसंती मिळालेल्या काश्मिरच्या विलो बॅटला मोठी मागणी आहे. भारताच्या उत्कृष्ट कारागिरीचे आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटवरच्या भारताच्या प्रभावाचे हे उदाहरण आहे. देशातला अग्रणी दुग्धोत्पादन व्यवसाय असलेल्या अमूलने नुकतीच अमेरिकेत त्यांची उत्पादने सादर केली आणि जगाच्या बाजारात भारतीय दुग्धोत्पादनांची चव पोचवण्याच्या प्रयत्नांप्रती वचनबद्धता राखली आहे.

भारताची डिजीटल देयक व्यवस्था युपीआय ला जागतिक स्तरावर मान्यता मिळाल्यानं अनेक देशांमध्ये डिजीटल पेमेंटचा मार्ग खुला झाला आहे. ही तांत्रिक प्रगती  भारताच्या अर्थतांत्रिक संशोधनातल्या नेतृत्व आणि जगभरात डिजीटल व्यवहारात क्रांती घडवण्याप्रती असलेल्या वचनबद्धतेला अधोरेखित करते. भारत आणि रशिया यांचा संयुक्त उपक्रम असलेली ब्राह्मोस क्षेपणास्त्र सध्या दक्षिण चीन समुद्रात कार्यरत आहेत. हा विकास भारताच्या धोरणात्मक संरक्षण क्षमतेवर तसेच जागतिक सुरक्षा वाढीसंदर्भात भारताच्या भूमिकेवर भर देतो. डिजीटल विपणन मंचांवर भारतीय उत्पादनांनी ॲमेझॉनच्या वैविध्यपूर्ण योजनांमध्ये वर्चस्व राखल्याने ती जागतिक पटलावर लक्षवेधक ठरली, यामुळे भारतीय बनावटीच्या वस्तूंची आंतरराष्ट्रीय मागणी वाढते आहे.

**<u>शिवराजसिंह चौहान</u>**

सन 2047 पर्यंत विकसित भारत बनवण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा संकल्प पूर्ण करण्यात कृषी आणि कृषी संबंधित क्षेत्रं महत्त्वाची भूमिका बजावतील, असा विश्वास केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी काल व्यक्त केला. नवी दिल्लीतील भारतीय कृषी संशोधन परिषदेचा 96वा स्थापना दिन आणि तंत्रज्ञान दिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा आत्मा असून शेतकरी हा त्याचा मुख्य कणा आहे, असं सांगून शेतकरी आणि शेती याला सरकारचं सर्वोच्च प्राधान्य

आहे, असं चौहान म्हणाले. यावेळी त्यांच्या हस्ते विविध पिकांचे 25 वाण आणि केवळ शेतकऱ्यांना समर्पित उत्पादनांचं अनावरण करण्यात आलं.

**<u>आयएमएफ</u>**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने चालू आर्थिक वर्ष 2024-2025 साठी भारताच्या आर्थिक वाढीचा दर वीस शतांश अंशांनी वाढून 7 टक्के राहील, असा अंदाज व्यक्त केला आहे. यापूर्वी एप्रिल महिन्यातही नाणेनिधीने आपल्या वर्ल्ड इकोनॉमिक आऊटलूकमध्ये भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पन्नाचा अंदाज 30 शतांशांनी वाढवून 6 पूर्णांक 8 टक्के केला होता. संस्थेने नुकत्याच प्रकाशित केलेल्या निरीक्षणामध्ये, भारताच्या ग्रामीण भागात खासगी खर्चामध्ये वाढ होण्याच्या शक्यतेमुळे हा अंदाज वर्तवला आहे. यामुळे भारत ही जगातली सर्वात वेगवान विकासाभिमुख अर्थव्यवस्था असल्याचं स्पष्ट केलं आहे.

**<u>जितेंद्र सिंग आरोग्य</u>**

फरिदाबाद इथल्या ट्रान्स्लेशनल आरोग्यविज्ञान आणि तंत्रज्ञान संस्थेमध्ये काल, आरोग्य संशोधनाशी निगडीत आशियातल्या पहिल्या प्री क्लिनिकल नेटवर्क सुविधेचे उद्घाटन विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांच्या हस्ते करण्यात आलं. ही सुविधा आशियातली पहिली आणि जागतिक स्तरावरील 9वी प्रयोगशाळा असल्याचं विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयानं म्हटलं आहे. सिंग यांच्या हस्ते जेनेटिकली डिफाईंड ह्युमन असोसिएटेड मायक्रोबियल कल्चर कलेक्शन या सुविधेचे उद्घाटन झाले. ही सुविधा संशोधन आणि विकास यासाठी संशोधन संस्था, विद्यापीठे आणि उद्योगांना सूक्ष्मजीव नमुने देण्यासाठीचे भांडार म्हणून कार्यरत राहिल. तसंच मंत्रालयाच्या अंतर्गत, लस विकसित करण्यासाठी जैवतंत्रज्ञान विभाग आणि खासगी क्षेत्र यांच्यामधल्या बारा करार आणि सामंजस्य करारावरही मंत्र्यांनी स्वाक्षरी केली.

**<u>शिक्षक पुरस्कार</u>**

राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार 2024 साठी स्वनामांकनं देण्याची तारखेला मुदतवाढ देण्यात आली असून, इच्छुक पात्र व्यक्ती येत्या 21 जुलैपर्यंत आपली नामांकनं शिक्षण मंत्रालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर सादर करू शकतात. त्रिस्तरीय निवड प्रक्रियेतून 50 शिक्षकांची निवड होणार असल्याचं शिक्षण मंत्रालयाच्या निवेदनात म्हटलं आहे.

**<u>गुजरात वैद्यकीय शुल्क</u>**

गुजरातमधल्या 13 सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांच्या शैक्षणिक शुल्कात कपात करण्यात आली आहे. मंत्रीमंडळांच्या बैठकीत काल हा निर्णय घेण्यात आला. चालू शैक्षणिक वर्षात जीएमईआरएस महाविद्यालयामध्ये शुल्कवाढीसाठी सरकारने जारी केलेल्या अधिसुचनेला विद्यार्थी आणि राजकीय पक्षांनी विरोध केल्यानंतर हे पाऊल उचलण्यात आलं आहे. गांधीनगरमध्ये याविषयी माहिती देताना गुजरातचे आरोग्यमंत्री ऋषीकेश पटेल यांनी विद्यार्थ्यांच्या हितासाठी हा निर्णय घेतला असून राज्य सरकारच्या 13 वैद्यकीय महाविद्यालयांतल्या 2100 जागांसाठी हा निर्णय लागू असेल अशी माहिती दिली. नव्या निर्णयानुसार शासकीय कोट्यातल्या जागेसाठी असलेल्या साडेपाच लाख रुपये शुल्कात कपात करून ते पावणेचार लाख रुपये तर व्यवस्थापन कोट्यातल्या जागेसाठीचे शुल्क 17 लाख रुपयांवरून 12 लाख रुपये करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

**<u>जयशंकर मॉरिशिअस</u>**

परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी मॉरिशसचे पंतप्रधान प्रविंद जगनाथ यांची काल भेट घेतली. यावेळी, दोन्ही नेत्यांनी उभय देशांच्या विशेष, स्थायी भागीदारीचा आढावा घेत, भविष्यातल्या विस्ताराची प्रशंसा केली. यावेळी बोलताना, उभय देशांचे संबंध भक्कम करण्यासाठी तसंच निरंतर सहकार्यासाठी तत्पर असल्याचं जयशंकर म्हणाले. यावेळी दोन्ही नेत्यांच्या हस्ते 12 उच्च प्रभावाच्या सामुदायिक विकास प्रकल्पांचे उद्घाटन झाले. तसेच अंतराळ सहकार्य, राष्ट्रीय अभ्यासक्रम संशोधन संस्था विकास, संस्कृत आणि भारतीय तत्वज्ञानासाठी भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेच्या नूतनीकरण तसंच भारतीय स्थलांतर संग्रहाचं अंकीकरण आदी करारांची देवाणघेवाण करण्यात आली.

**गोयल स्वित्झर्लंड**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी स्वित्झर्लंडचे उद्योग मंत्री गाय पार्मेलिन यांच्याशी काल व्यापार आणि वाणिज्य भागीदारी करारामध्ये निश्चित केलेली उद्दीष्ट्य साध्य करण्यासाठी काम करण्याची चर्चा केली. गोयल दोन दिवसांच्या स्वित्झर्लंड दौऱ्यावर आहेत. द्वीपक्षीय चर्चेदरम्यान या करारामुळे व्यापार आणि गुंतवणूक भागीदारीसाठी उत्तम रचना मिळाल्याला दोन्ही नेत्यांनी दुजोरा दिला.

**नीती आयोग**

केंद्र सरकारनं नीती आयोगाची पुनर्रचना केली आहे. संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री यांच्यासह कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांचा पदसिद्ध सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी नीती आयोगाच्या अध्यक्षपदी कायम असून, सुमन बेरी या उपाध्यक्षपदी कायम राहातील. विशेष निमंत्रितांमध्ये रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नीतिन गडकरी, आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांचा समावेश आहे. व्ही के सारस्वत, प्रो. रमेश चंद, डॉ व्ही के पॉल आणि आनंद विरमानी हे आयोगाचे पूर्णवेळ सदस्य आहेत.

**भारत नागरी हक्क**

भारतानं जिनिव्हा इथं मानवाधिकार समितीचा नागरी आणि राजकीय हक्कांवरील आंतरराष्ट्रीय कराराअंतर्गत चौथा नियमित आढावा पूर्ण केला आहे. ॲटर्नी जनरल आर वेंकटरमनी आणि सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व केलं. यावेळी झालेल्या चर्चेदरम्यान, मानवाधिकार समितीच्या सदस्यांनी बहुलवाद, अहिंसा आणि विविधता या तत्वांमध्ये रुजलेल्या भारताची परंपरा आणि संस्कृतीच्या गुणवैशिष्ट्यांचे कौतुक केलं. जे मानवी हक्कांच्या साराशी सुसंगत आहेत.

**शिक्षण कार्यशाळा**

उच्च शिक्षणाच्या विविध अभ्यासक्रमांच्या अभ्यासाचं साहित्य भारतीय भाषांमध्ये तयार करण्याची गरज केंद्रीय शिक्षण राज्य मंत्री डॉ. सुकांत मुजुमदार यांनी अधोरेखित केली आहे. भारतातील अफाट भाषिक वैविध्याचं चित्र शिक्षणव्यवस्थेत उमटणं आवश्यक असून देशातील विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेतून ज्ञान संपादन करता येईल हे देखील सुनिश्चित करणं गरजेचं आहे, असं ते म्हणाले. नवी दिल्लीत काल उच्च शिक्षणासाठी भारतीय भाषांमधून पाठ्यपुस्तकांचं लेखन या विषयावर कुलगुरुंकरिता एक दिवसीय कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं होतं, त्याच्या उद्घाटनानंतर डॉ. मुजुमदार बोलत होते. विद्यापीठ अनुदान आयोग आणि भारतीय भाषा समितीनं संयुक्तरीत्या ही कार्यशाळा आयोजित केली होती.

**अमरनाथयात्रा**

अमरनाथ यात्रेसाठी 3 हजार 740 यात्रेकरूंची आणखी एक तुकडी जम्मूतील भगवती नगर यात्री निवास इथून आज पहाटे रवाना झाली. 127 वाहनांमधून निघालेल्या ताफ्यात पुरुष आणि महिलांसह 9 लहान मुलं, 39 साधू आणि 6 साध्वींचा समावेश आहे.

**केरळ पाऊस**

केरळला मुसळधार पावसानं झोडपल्यानं संपूर्ण राज्यात विशेषतः उत्तर आणि मध्य भागात मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. राज्याच्या डोंगराळ भागात तसंच नदीकाठच्या भागांना देण्यात आलेला अतिदक्षतेचा इशारा अद्यापही कायम आहे. पावसाचा फटका जिल्ह्यांमध्ये मदत शिबिरं सुरू करण्यात आली आहेत. तसंच कन्नूर, कोळीकोड, वायनाड, पलक्कड, त्रिशूर, इडुक्की, अलापुझा आणि कोट्टायम या आठ जिल्ह्यांमध्ये संततधार पाऊस सुरू असल्यानं तिथल्या सर्व शैक्षणिक संस्थांना प्रशासनानं सुट्टी जाहीर केली आहे. तथापि परीक्षांच्या पूर्वनियोजित वेळापत्रकात कोणताही बदल होणार नसल्याचं प्रशासनानं स्पष्ट केलं आहे. पलक्कड आणि इडुक्की ही पर्यटनस्थळं बंद करण्यात आली आहेत तर डोंगराळ भागातून रात्रीच्या वेळी प्रवास करण्यासही मनाई करण्यात आली आहे. दरम्यान, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची नऊ पथकंही राज्यात पोहोचली आहेत.

राज्यात पावसामुळं उद्भवणाऱ्या संभाव्य परिस्थितीला तोंड देण्यासाठी लष्कर, इंडो-तिबेटन दल आणि सीआरपीएफची पथकंही सज्ज आहेत.

**महिला क्रिकेट**

श्रीलंकेत डंबुला इथं येत्या शुक्रवारपासून सुरू होत असलेल्या आशिया चषक टी ट्वेंटी स्पर्धेत सहभागी होण्यासाठी भारतीय महिला क्रिकेट संघ काल कोलंबोमध्ये दाखल झाला. हरमनप्रीत कौर हिच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाची सलामीच्या सामन्यातच कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी गाठ पडणार आहे. स्पर्धेतील अ गटामध्ये भारत आणि पाकिस्तान शिवाय संयुक्त अरब अमिराती आणि नेपाळच्या संघांचा समावेश आहे. तर यजमान श्रीलंकेसह मलेशिया, थायलंड आणि बांगलादेश हे संघ ब गटात आहेत.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.